Con. 5241-10. NOV 2010 I.P.C. AM-5229

(3 Hours) Sem-II [Total Marks : 100

1. Answer in not more than two sentences (all are **comulsory**) :- 20
   - (a) State any two offences which are an exception to the doctrine of Mens Rea.
   - (b) Give any two categories of rape other than rape against will or without consent.
   - (c) Define criminal conspiracy.
   - (d) State any two offences relating to elections.
   - (e) What is wrongful restraint ?
   - (f) Define Dishonest Misappropriation of Property.
   - (g) What is Sedition ?
   - (h) Give any two points of difference between Civil and Criminal Law.
   - (i) How and why is the term 'Year' defined in the IPC ?
   - (j) State any two landmark cases connected with attempt to commit suicide.

2. Write short notes on (any **four**) :- 20
   - (a) Kinds of Punishment in IPC.
   - (b) Actus Reus
   - (c) Bigamy
   - (d) Dacoity
   - (e) Custodial Rape
   - (f) Forgery.

3. Solve any **two** (with reasons) :- 12
   - (a) Sachin is playing cricket with his friends in his building compound. Anjali is passing by and Sachin hits the ball deliberately in her direction. The ball goes and hits Anjali's dupatta. Anjali gets irritated and calls Sachin a rascal.
     - (i) What offence if any has Sachin committed ?
     - (ii) If Anjali merely smiles and throws the ball back, but Anjalis mother who is accompanying her is angered and calls the boys good for nothing. Would the answer to (i) be the same ?
   - (b) Bandya sees his neighbor Bina sitting on the beach in a compromising position. He clicks her photo using his cell phone and later on confronts her and shows the picture stating that he will show the pictures in her college unless sleeps with him. Bina agrees and they have sexual intercourse.
     - (i) Is Bandya guilty of rape ?
     - (ii) If Bandya is accompanied by his friend Billu in the above instance and both have sexual intercourse with Bina would there be any difference in punishment ?
   - (c) Umer boards a B.E.S.T. bus. He stands beside Shakila in the bus and rubs himself against her. He then spits on the window of the bus. When he gets a seat he digs his pen into the seat of the bus and makes holes in the seat. He finds a cheque dropped by somebody on the seat next to him and pockets it.
     - (i) What are the offences committed by Umer if any ?
     - (ii) Cite reasons for your answer.

4. Answer in detail (any **four**) :- 48
   - (a) The basic offence of 'voluntarily causing hurt' can vary in intensity depending upon various factors. Elaborate.
   - (b) Explain with suitable illustrations the General Exceptions coming under the category of Incapacity.
   - (c) Write a detailed explaination of the Offence of Murder in the Indian Penal Code.
   - (d) Explain the various stages of crimes. Cite with examples from the IPC whether acts in each stage are punishable.
   - (e) Explain along with all the variations thereof the offence of Criminal Trespass.
   - (f) What are the provisions regarding Joint Criminal Liability in the IPC ?

१. थोडक्यात उत्तरे लिहा (**दोन** वाक्यांपेक्षा जास्त नको) :- १०

(अ) 'मेन्स रिया' च्या तत्त्वाला अपवाद असलेले दोन गुन्हे कोणते ते सांगा.

(ब) 'इच्छेविरूध्द किंवा परवानगीशिवाय केलेला बलात्कार सोडून बलात्काराचे इतर कोणतेही दोन प्रकार सांगा.

(क) फौजदारी कटाची व्याख्या सांगा.

(ड) निवडणुकीसंदंर्भातील कोणतेही दोन गुन्हे सांगा.

(इ) चुकीच्या पध्दतीने अटकाव किंवा प्रतिबंध करणे म्हणजे काय ते सांगा.

(फ) अप्रामाणिक उद्देशाने संपत्ती हडप करणे म्हणजे काय ते सांगा.

(ग) राजद्रोह म्हणजे काय ?

(ह) दिवाणी व फौजदारी कायद्यामधील फरकाचे दोन मुद्दे सांगा.

(स) भारतीय दंड संहितेमध्ये 'वर्ष' या शब्दाची व्याख्या का व कशी केली आहे ?

(द) आत्महत्येच्या प्रयत्नासंबंधीचे दोन महत्त्वाचे केस लॉ सांगा.

२. थोडक्यात टिपा लिहा (कोणत्याही **चार**) :- २०

(अ) भारतीय दंड संहितेमधील शिक्षांचे प्रकार

(ब) ॲक्टस रेउस (बिजने त्मने)

(क) दोन बायका किंवा दोन नवरे असण्याचा गुन्हा

(ड) दरोडा

(इ) कोठडीतील बलात्कार

(फ) बनावड लेख किंवा बनावट दस्ताचा गुन्हा.

३. सोडवा (कोणतेही **दोन**) :- १२

(अ) सचिन आपल्या मित्राबरोबर इमारतीच्या आवारात क्रिकेट खेळत आहे. अंजली तिथून जात असताना सचिन मुद्दामच तिच्या दिशेने चेंडू मारतो. तो चेंडू अंजलीच्या दुपट्टयाला लागतो त्यामुळे अंजली भडकून त्याला 'हरामखोर' म्हणते.

(१) सचिनने केला असल्यास कोणता गुन्हा केला ?

(२) पण जर अंजलीने हसून बॉल परत केला परंतु, तिच्या बरोबर चालणाऱ्या आईने सचिनबद्दल बरेबाईट शब्द वापरले तर तुमचे उत्तर तेच असेल का ?

(ब) बंड्याने त्याची शेजारीण बिना हिला बीचवर लज्जा उत्पन्न होईल अशा अवस्थेत बसलेली पाहिली. त्याने आपल्या सेलफोनने तिचा फोटो काढून तिला दाखविला आणि सांगितले की, तिने जर त्याला शरीरसुख देण्यास नकार दिला तर तिचे त्या अवस्थेतील ते फोटो तो कॉलेजमध्ये दाखवेल. बिना त्या गोष्टीला तयार झाली व त्या दोघांनी शरीरसुख घेतले.

(१) बंड्याने बलात्काराचा गुन्हा केला आहे का ?

(२) वरील प्रंसगामध्ये बंड्यासह त्याचा मित्र बिलू सामील झाला असेल व त्या दोघांनी बिना समवेत शरीरसुख घेतले असेल तर वरील शिक्षेत काही फरक होईल का ?

(क) उमर एका बसमध्ये चढतो शकीलाच्या बाजूला उभा राहून तिच्या अंगाला अंग घासतो त्यानंतर तो बसच्या खिडकीच्या काचेवर थुंकतो. जेव्हा त्याला बसायला जागा मिळते, तेव्हा तो पेनाने सीटला भोके पाडतो. त्यानंतर तो कुणाचा तरी पडलेला चेक बघतो आणि उचलून खिशात टाकतो.

(१) उमरने गुन्हे केले असतील तर ते कोणते ?

(२) तुमच्या उत्तरासंबंधीची पर्याप्त कारणे लिहा.

४. सविस्तर लिहा (कोणतीही **चार**) :- ४८

(अ) 'स्वतःस दुखापत करण्याच्या हेतूने केलेल्या गुन्हाच्या गंभीरतेमध्ये वेगवेगळ्या घटकांमुळे काही फरक पडेल का ? स्पष्टीकरण द्या.

(ब) 'असमर्थतेच्या कारणासाठी असणारे सर्वसाधारण अपवाद कोणते ते त्या संबंधीची समर्पक उदाहरणे देवून स्पष्ट करा.

(क) भारतीय दंड संहितेमधील खुनाच्या गुन्हासंबंधीचे सविस्तर विश्लेषण लिहा.

(ड) गुन्ह्याच्या वेगवेगळ्या पायऱ्या कोणत्या ते सांगा. भारतीय दंड संहितेप्रमाणे प्रत्येक टप्प्यांतील गुन्हा हा शिक्षेस पात्र आहे का ?

(इ) फोजदारी पात्र अतिक्रमणाच्या गुन्ह्यासंबंधीचे सविस्तर विवेचन त्यातील वेगवेगळ्या बारकाव्यासह करा.

(फ) गुन्ह्यांतील सहभागासंबंधीच्या भारतीय दंड संहितेतील तरतूदी कोणत्या ते सांगा.

-------------